# अप्पर आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे

---

## <u>विधी अधिकारी पदासाठी मुलाखत</u>

भारतीय राष्ट्रीय महामार्ग अधिनियम 1956 चे कलम 3 जी अन्वये प्राप्त लवाद अर्जांचे कामकाज पाहिले जाते. विधी अधिकारी यांची कंत्राटी तत्वावर नियुक्ती करणेस अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

अ) सदर पदाची नेमणुक ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल हे विधी अधिकारी शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

ब) सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: 11 महिन्यासाठी करण्यात येणार असून 11 महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल.

क) करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणारे विधी अधिकारी यांना एकत्रित मानधन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाहीत. (एकत्रित मासिक मानधन + दुरध्वनी व प्रवास खर्च असे एकुण 20000+5000= 25000/-)

**<u>शैक्षणिक अर्हता व अनुभव :-</u>**

1) **<u>उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठचा कायद्याचा पदवीधर असेल. तो सनदधारक असेल.</u>**
2) **<u>विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान 7 वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.</u>**
3) **<u>उमेदवार महसूल विषयक,भूसंपादन प्रक्रिये विषयक , प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ. बाबत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.</u>**
4) **<u>उमेदवारास मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असेल.</u>**
5) **<u>विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी 45 वर्षापेक्षा जास्त नसेल.</u>**

उपरोक्त नमुद शैक्षणिक अहर्ता व अनुभव असणारे उमेदवारांनी मुलाखतीसाठी विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग, पुणे (करमणूक कर शाखा) यांचे कार्यालयात दि. 23/02/ 2018 रोजी ठिक 11.00 वाजता समक्ष मूळ कागदपत्रासह उपस्थित रहावे.